प्रोप्रा.गायसमुद्रे 9527407701 8459953702
SM
एस.एम गारमेंट
शर्ट-पॅन्टचा कारखाना
पॅन्ट-शर्ट अरमानी शेरवानी सफारी
आमच्याकडे सर्व प्रकारचे ड्रेस एक तासात शिवून मिळतील
बीड रोड , न्यायालया समोर केज जि.बीड
प्रोप्रा.गायसमुद्रे मो.न.9527407701 8459953702
एक वेळ अवश्य भेट द्या

दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● शनिवार ३१ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक १६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

गाव तेथे वार्ताहर
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात
वार्ताहर/पत्रकार आणि जाहिरातदार नेमणे आहेत.
वादळ वार्ता
या लोकप्रिय दैनिक वृत्तपत्राकरिता महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामीण भागात प्रतिनिधी नेमणे आहेत. इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा.
दैनिक वादळ वार्ता
जॉईन झालेल्या प्रत्येक प्रतिनिधींना आय कार्ड आणि नियुक्ती पत्र दिले जाईल.
* पात्रता *
समाजसेवेची आवड, जनसंपर्क, फोन असणे आवश्यक ,सोशल मीडियाचा वापर करता येणे
दैनिक वादळ वार्ता
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव विभागीय निर्भिड दैनिक
मो.न.9422660077

# अबब ! घोळच- घोळ ; पत्रावर आवक/जावक नंबरच नाही


# केजच्या बिडिओ तथा विस्तार अधिकाऱ्यानी सोडायला लावले आमरण उपोषण

## गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांच्या तसेच उपोषणकर्त्या समोर कर्मचाऱ्यांची दादागिरी

गट विकास अधिकारी हा पंचायत समितीमधील अधिकारी आणि कर्मचारी यांच्याकडून विविध विवरणपत्रे, हिशोब, अहवाल व त्याबाबतचे स्पष्टीकरण मागवितो. पंचायत समिती आणि राज्य शासन यामध्ये दुवा म्हणून गट विकास अधिकारी कार्य करतो. गट विकास अधिकारी पंचायत समितीचा अहवाल जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे पाठवतो. यासाठी वा इतर विकास कामानंसाठी गटविकास अधिकारी काम करतो मात्र केजच्या गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने या केजचा अतिरिक्त पदभार असल्यामुळे आठवड्यातील दोन दिवसानंसाठी अंबाजोगाईहुन येऊन केजचा कारभार पाहतात त्यामुळे म्हणावी ऐवढी वचक या कार्यालयातील कर्मचाऱ्यांवर तथा अधिकाऱ्यांवर नसल्यामुळे रोजगार सेवक ते वरिष्ठ कर्मचारी, अधिकारी आपल्या मनःमर्जीने वागत असल्याचे जनतेत बोलले जात आहे.

केज तालुक्यातील मौजे धनेगाव येथील मागासवर्गीय समाजातील रंजित महादेव सोनवणे, छत्रभुज पांडुरंग सोनवणे, खंडु शेषेराव सोनवणे, संजय दत्तु सोनवणे रमाई घरकुल योजनेचा तीसरा हप्ता द्यावा तसेच पैशाची मागणी करणारा रोजगार सेवक बालासाहेब अरुण शिंदे यास निलंबित करावे यासह विविध मागण्याच्या संदर्भाने केज पंचायत समिती कार्यालयाच्या परिसरात दि. ३० ऑगस्ट वार शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता आमरण उपोषणास बसले होते . सायं ५ वाजता गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने या आपल्यासोबत विस्तार अधिकारी रोडेवार आर.एच.,ग्रामसेवक डि. व्हि.बिराजदार यांच्यासह रोजगार सेवकांचा ताफा घेऊन दाखल झाल्या. सदरील ठिकाणी अगोदरच पत्रकार बांधव उपस्थित होते परंतु गटविकास अधिकाऱ्यांनी चित्रफीत ( व्हिडीओ ) घेण्यास पत्रकारांना मज्जाव केला. आमच्या मागण्या मान्य होतं नाहीत तोपर्यंत उपोषण सोडणार नसल्याचे उपोषणकर्त्यांनी नसल्याचे स्पष्ट केले. अगोदर ग्रामसेवक डि. व्हि. बिराजदार व रोजगार सेवक बालासाहेब अरुण शिंदे याच्यावर करवाई करा त्यानंतरच उपोषण सोडु असे उपोषणकर्ते म्हणताच चक्क गटविकास अधिकारी समृद्धी दिवाने यांच्यासमोर ग्रामसेवक डि. व्हि. बिराजदार " काय कारवाई करायची ते करा " असा उपोषण कर्त्याला दम दिला तसेच विस्तार अधिकारी रोडेवार यांनी पत्रकारानं सोबत हुज्जत घातली मात्र यावर कोणताही प्र शब्द गटविकास अधिकारी यांनी काढला नाही. उलट उपोषणकर्त्यालाच उलट प्रश्न विचारून वेळ मारून नेण्याचा प्रयत्न केला. त्यातच विशेष म्हणजे उपोषण सोडण्यासाठीचे जे पत्र गटविकास अधिकारी समृद्धी





जिल्हा परिषद बीड
पंचायत समिती केज जि.बीड
जा.क./पसक/सकप/कावि/ / /२०२४ दिनाक ३०.०८.२०२४

प्रति,
१) श्री.रोडेवाड आर एच (वि.अ.पं.)
२) श्री.कोरडे डी एम स.का.अ
पंचायत समिती केज

विषय : दिनांक 30.08.2024 रोजी पंचायत समिती कार्यालय केज समोर अमरण उपोषणास बसणे बाबत.
संदर्भ : श्री.रंजीत महोदव सोनवणे व इतर रा.सर्व धनेगाव ता.केज यांचे तकार अर्ज दि.१६.०८.२०२४.

उपरोक्त विषयी व संदर्भिय पत्रकान्वये आपणास कळविण्यात येते की, मौजे धनेगाव ता. केज येथील ग्राम रोजगार सेवक श्री बालासाहेब अरूण शिंदे यांच्या गैर जिम्मेदारीमुळे व्यवहारामुळे त्यांना निलंबीत करण्यासाठी या कार्यालयास पत्र देउन आज दिनांक 30.08.2024 रोजी या कार्यालयासमोर उपोषणास बसले आहेत. तरी संदर्भिय तकार अर्जाची छायांकीत प्रत देवुन आपणास सुचित करण्यात येते की, वरील विषयांकीत प्रकरणी संयुक्तपणे चौकशी करुन संयुक्त चौकशी अहवाल या कार्यालयास 7 दिवसात सादर करावा. [illegible]
सोबत : संदर्भिय तकार अर्जाची छायांकीत प्रत जोडली आहे.

-sd-
गटविकास अधिकारी वर्ग १
पंचायत समीती केज

प्रतिलीपी :-
1. श्री.रंजीत महोदव सोनवणे व इतर रा.सर्व धनेगाव ता.केज यांना देउन कळविण्यात येते की,आपल्या अर्जाप्रमाणे चौकशीसाठी आदेशीत करण्यात आले आह.चौकशी अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल तरी आज दिनांक 30.08.2024 रोजी या कार्यालयासमोरील उपोषणापासुन परावृत व्हावे व प्रशासनास सहकार्य करावे.
2. सरपंच/ग्रामसेवक ग्राम पंचायत कार्यालय धनेगाव यांना देउन कळविण्यात येते की,तकारीच्या अनुषगाने अवश्यक अभिलेखे सादर करावे.
3. पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन केज/युसुफवडगाव यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.
4. वैदयकीय अधिकारी ग्रामीण रूग्नालय केज यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव देण्यात येते.

गटविकास अधिकारी वर्ग १
पंचायत समीती केज

दिवाने ,विस्तार अधिकारी रोडेवार आर.एच.,ग्रामसेवक डि. व्हि. बिराजदार हे घेऊन आले होते व ज्या पत्राव्दारे उपोषणकर्त्यांनी उपोषण सोडले त्यावर आवक-जावक नंबरच नसल्यामुळे या उपोषणकर्त्याच्या मागण्यांचे काय होणार ? असा प्रश्न जनेतेच्या चर्चेचा विषय बनला आहे. जर संविधानिक पदावर बसणारे अधिकारी , कर्मचारी इतक्या बेजबाबदार प्रकारे वागत असतील व त्यामुळे जनतेला मानसीक , शारीरीक व आर्थिक त्रासाला समोरे जावे लागत असेल तर आश्या अधिकारी, कर्मऱ्यांवर कारवाई होने गरजेचे आहे. असे सर्वसामान्य जनतेमध्ये बोलले जात आहे.




# राज्यस्तरीय क्रिकेट स्पर्धेत बीड ग्रामीण संघ चमकला प्रशिक्षक सुशील तांबे सर यांच्या संघाची कामगिरी

**पाटोदा प्रतिनिधी:-**

बारामती येथे पार पडलेल्या अंडर 17 स्पर्धेमध्ये बीड ग्रामीण संघाने क्वार्टर फायनल पर्यंत मजल मारून पाचवा येण्याचा बहुमान मिळवला. पाटोदा येथील ओषण क्रिकेट ॲकॅडमी च्या मुलांनी बारामती येथे होणाऱ्या स्पर्धेत बीड जिल्हा संघाकडून सहभाग नोंदवा ला. त्यामध्ये पहिल्याच प्रयत्नात क्वार्टर फायनल पर्यंत जाऊन पूर्ण राज्याचे लक्ष वेधून घेतले. या संघामध्ये शंतनू दूध वडे, तेजस चोले सुयोग जाधव नैतिक जाधव प्रेमराज जाधव शंभुराजे घुमरे करण घुमरे . अरहान शेख दानिश पठाण अंशकांक्रीया संकेत बांगर गणेश चौरे प्रसाद नागरगोजे . शुभम घोडेस्वार व स्वराज डी डूळ याचा समावेश होता. .संघाच्या यशस्वीतेसाठी प्रशिक्षक सुशिल तांबे सर यांनी विशेष तयारी करून घेतली.संघाचे जील्हयात कौतुक होत आहे

# छत्रपती शिवरायांचा पुतळा कोसळणे हे दुर्दैव= सागर बाळासाहेब चव्हाण

**सांगली प्रतिनिधी :-**

छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे, असे मत सांगली जिल्ह्याचे शेतकरी नेते सागर चव्हाण यांनी व्यक्त केले. सागर चव्हाण म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गेल्या वर्षी डिसेंबर मध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे उद्घाटन झाले होते. पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन झालेल्या पुतळ्याचे काम किती



निकृष्ट झाले होते यावरून लक्षात येते.अशा पद्धतीने हा पुतळा कोसळणे हे महाराष्ट्राचे दुर्दैव आहे . महाराष्ट्राची अस्मिता छत्रपती शिवाजी महाराज आहेत. परंतु झालेले निकृष्ट बांधकाम आणि प्रशासकांनी केलेले दुर्लक्ष यामुळे हे घडलेले आहे. शेकडो वर्षापूर्वीचे किल्ल्याचे बुरुज अजुनही सुस्थितीत आहेत. परंतु आठ महिन्यांमध्ये उभा राहिलेला छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळतो. हा महाराजांचा व महाराष्ट्राचा अपमानच आहे. या घटनेचा मी मराठा समाजाच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करतो. झालेल्या घटनेची सखोल चौकशी होऊन, संबंधितांच्यावर तातडीने कारवाई करावी . अशी समाजामधून होत आहे.

## !! विचारधन !!

आयुष्यात कितीही मोठे झालात तरी गावाकडच्या मातीला अनं अगोदरच्या गरीबीला कधीही विसरु नका...
चांगले कर्म करा,रस्ता चांगलाच मिळतोच...
मनुष्य कधी जन्माला येतो आणी कधी मरतो हे त्याच त्यालाच कळत नाही...देहाचा भरवसा नाही,आज हसत खेळत असतो तर उद्या सरणावर पसरतो... आयुष्य खुप गोड आहे फक्त ते योग्य रितीने जगता आले पाहीजे...आपण जर काही लेखन किंवा संभाषण करत असू तर आपले जसे विचार आहे त्याप्रमाणे आपली वर्तवणूक पाहीजे...
समाजात मोठ व्हायला पैसा नको,अभ्यास कमी असलातर चालेल,काही एखादे वैशिष्ट नसले तरी चालेल पण आपले आचार,विचार आणी वर्तवणूक आपल्याला मोठं बनवतात...
एखादा छान यशाचा मार्ग दाखवत असेल तर त्याचे बोट धरुन नक्की चला...फक्त पाय जमीनीवर ठेवून.
तेव्हां माणसं जोडण्याचे करा,
तोडण्याचे नको,मनातुन लांब गेलेला लवकर परत येत नाही...
वेळ निघुन गेल्यावर पश्चाताप निश्चित होतो...

श्री केशव चिलगर
जय हो

## मा.अजित दादा पवार काय दिलं ? रस्त्यावर खडी रोडवर मुरूम आम आदमी पार्टीचा प्रश्न ?

# माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी

**बीड । प्रतिनिधी**

बीड मध्ये काल मा. उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व पालकमंत्री व कृषी मंत्री धनंजय जी मुंडे साहेब, यांची बीडमध्ये जनसंमानयात्रा करण्यात आली वर या यात्रेच्या नावाखाली जनतेचे लाखो करोडो रुपये खर्च करून तामझम करण्यात आला या बीडमध्ये लाखो करोडो रुपये खर्च करून छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम बनवण्यात आले ते बीडमध्ये एकमेव नागरिकांसाठी सेवा देणारा वाकिंग ट्रॅक आहे त्या वॉकिंग चा खोदून त्याचा सत्यानास करून त्याचं खूप मोठं नुकसान करण्यात आले या एवढ्या मोठ्या खर्चातून बीडच्या जनतेला काय भेटले तर रस्त्यावर मोकळी खडी आणि मुरूम या जनसमान यात्रेचा हाच विकास आहे का



असा प्रश्न बिडकर चर्चेमध्ये व आंदोलनाने सांगण्याचा प्रयत्न करत आहे हा प्रश्न घेऊन आम आदमी पार्टी संपूर्ण बीड करांच्या दारा दारात जाऊन जनतेला अवगत करणार आहे यावेळी जनतेशी संवाद करताना यावेळी आम आदमी पार्टीचे माजी सैनिक अशोक येडे जिल्हाध्यक्ष सय्यद सादेक शहराध्यक्ष रामभाऊ शेरकर मीडिया प्रमुख तालुका उपाध्यक्ष आजम खान, बीड जिल्हा अल्पसंख्याक विभाग प्रमुख रफिक पठाण, युवा नेते प्रवीण आणेराव, इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भटक्या विमुक्त आदिवासी समूहाच्या विविध मागण्यांचे जिल्हाधिकारी यांना निवेदन

बीड । प्रतिनिधी

७२ व्या भटके विमुक्त आदिवासी परिषदेची संयोजन समिती महाराष्ट्र राज्याच्या वतीने भटके मुक्त आदिवासींच्या हक्कासाठी राजीव गांधी संवाद यात्रा दिनांक २८ ऑगस्ट पासून ते २३ सप्टेंबर मुंबई पर्यंत होत आहे त्याचे उद्घाटन पुणे येथील फुले वाड्यात झाले असून. ही समाधी यात्रा १८ जिल्ह्यांच्या ३० तालुक्यात जाऊन शेवटी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे मंत्रालयात मागण्या घेऊन जाणार आहे. यावेळी निवेदन देताना, मंगल कानडे कौशल्या कळसुले, मीरा घोडके, महादेव नरवडे, कुसुम बरडें, परमेश्वर पवार, रामेश्वर पवार, सुदाम पवार गोरख पवार, बाबासाहेब बर्डे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे. भटके विमुक्त, आदिवासी संयोजन समिती, महाराष्ट्र राज्य भटके विमुक्त, आदिवासी समुदायाच्या प्रमुख मागण्या महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात भटके विमुक्तासाठी स्वतंत्र मंत्रालय व त्यासाठी भटके विमुक्त जमातीतीलच मंत्र्याची नेमणूक करावी.भटके विमुक्तांची जातिनिहाय जनगणना करावी. न्या.अशोक अग्रवाल यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या शासन निर्णयानुसार १४ विमुक्त व २८ भटक्या जमातींचा सर्वकष अभ्यास करून केंद्रशासनाकडे केलेल्या अनुसूचित जाती - जमाती मध्ये समाविष्ट करण्याबाबत केंद्र सरकारला सादर केलेल्या शिफारसीनुसार तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.व केंद्रीय पातळीवर सर्व भटके विमुक्त समुहाचे एकत्रीकरण करावे. भटके विमुक्त कल्याणासाठी पर्याप्त बजेट असावे.व आदिवासींसाठी बजेटचा कायदा करण्यात यावा. बार्टी,सारथी आणि महाज्योतीच्या धर्तीवर भटक्या विमुक्ताच्या कल्याणासाठी विचाराधीन असणाऱ्या वनार्ती ( वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था) तात्काळ कार्यान्वित करावे. अनुसूचित जाती,जमाती यांच्यावरील होणाऱ्या अन्याय अत्याचारासाठी



प्रतिबंध घालण्यासाठी असणाऱ्या कायद्यामध्ये (ATROCITY act ) मुळ भटके,विमुक्त जातीचा समावेश करून त्यांना संरक्षणकवच मिळावे. भटके,विमुक्त जमातीचे पारंपारिक व्यवसाय जसे कि, कटलरी विकणे, भंगार गोळा करणे आदी कामासाठी त्यांना परवाने व ओळखपत्र शासकीय स्तरावरून मिळावे. भटक्या,विमुक्त जमातीतील मुलांना बालवाडी ते पदवीत्तरपर्यंतचे शिक्षण मोफत मिळावे.या समुहातील विद्यार्थ्यांना स्वतंत्र वसतिगृहे असावीत.भटके विमुक्त, आदिवासी मुलांच्या मातृभाषेचा वापर करून शिक्षण देणे,भटके विमुक्त आदिवासी समुदायातील युवक-युवतींना छात्रवृत्ती देऊन उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे.राज्याच्या सर्व विद्यापीठांमध्ये 'विमुक्त जाती व भटक्या जमातीं अध्यासन व संशोधन केंद्र' स्थापन करणे. नागरिकत्व पुरावे मिळविण्यासाठी एक खिडकी पद्धत असावी.महाराष्ट्र शासनांनी भटके विमुक्त आदिवासी समाजाचे नागरिकत्व पुराव्यांचा प्रश्न कायमचा सोडविण्यासाठी जिल्हा प्रशासनास नागरिकत्व पुरावे काढून देण्याच्या अनुषंगाने दर दोन महिन्यांनी शिबीर / मेळावा आयोजित करून हा प्रश्न मार्गी लावावा. भटके विमुक्त ,आदिवासी समाजाच्या योगदानाला मान्यता देणे आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी 31-ऑगस्ट हे 'विमुक्त दिन' म्हणून घोषित करण्यात यावे. विमुक्त दिनाच्या निमित्ताने 16 ऑगस्ट ते 30 ऑगस्ट या पंधरवड्यात राज्यभर 'भटके विमुक्त पंधरवडा' म्हणून साजरा करण्यात यावे. समाजाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी या पंधरवड्यात "शासन भटके विमुक्तयांच्या दारी" ही संकल्पना राबविणे, यामुळे समाजाच्या समस्यांवर चर्चा होईल आणि त्यांच्या कल्याणासाठी उपाययोजना करण्यास शासनाला मदत होईल.या घटकांप्रती प्रशासनास संवेदनशील करणे. महाराष्ट्र शासनने जिल्हा प्रसाशनसह सर्व ग्रामपंचायतींना आदेश द्यावे कि त्यांनी प्रत्येक जिल्हा आणि ग्रामपंचायतीच्या स्तरावर 'भटके विमुक्त आदिवासी विकास आराखडा' तयार करावा. या आराखड्यात भटके विमुक्त आणि आदिवासी समाजातील नागरिकांना जागा,घर, शिक्षण, आरोग्य, मनरेगा योजनेद्वारे रोजगार आणि वस्तीत पायाभूत सुविधा प्राधान्याने उपलब्ध करून देण्याबाबतचे स्पष्ट नियोजन करावे.

भटके विमुक्त जमातीतील धनगर,रामोशी व वडार या स्वतंत्र जमातीसाठी असणाऱ्या महामंडळाचा लाभ सर्व भटके विमुक्त जमातीला देण्यात यावा.भटके विमुक्त, आदिवासी यांचे गायरान, गावठाण, वनजमीन व इतर निवासी व उपजिविका अतिक्रमणांचे नियमितीकरण करण्यात यावे.


# गंगापूर तहसीलदार नसल्याने शेतकरी कृती समितीने दिले खुर्चीला निवेदन

गंगापूर । प्रतिनिधीजून ते जुलै २०२४ दरम्यान अतिवृष्टी पंचनामे झाले नाहीत २०ऑगस्ट पासून झालेल्या अतिवृष्टी ढगफुटीचे पंचनामे करून शासन निर्णयानुसार नुकसान भरपाई मिळण्यासाठी प्रस्ताव पाठवावेत अशी मागणी कृती समितीने केली आहे मात्र तहसीलदार नसल्याने शेतकरी कृती समितीच्या वतीने इंजिनीयर महेश गुजर ,राहुल ढोले, अण्णासाहेब जाधव, यांनी तहसीलदार यांच्या रिकाम्या खुर्चीला निवेदन दिले राज्य शासनाने घोषित केलेल्या अतिवृष्टी या नैसर्गिक आपत्ती करिता अतिवृष्टीच्या निकषानुसार मंडळामध्ये २४ तास ६५ मिलिमीटर पेक्षा जास्त नोंद झालेली असल्यास तसेच मंडळातील गावांमध्ये ३३% पेक्षा जास्त शेती पिकांचे नुकसान झालेले असल्यास ही मदत अनुज्ञेय राहील असे नमूद केले आहे दरम्यान



गंगापूर तालुक्यात माहे जीवन ते जुलै दरम्यान पडलेल्या पावसाचे पंचनामे करण्यात आलेले नसल्याने खरीप २०२४-२५ हंगामात उशिरा पेरणी दुबार पेरणी पूर परिस्थितीसह इतर नुकसानीची माहिती शासनाकडे पोहोचलेली नसल्याने नुकसान भरपाई मिळालेली नाही शासन निर्णयानुसार जीवन व जुलै महिन्याचा अहवाल पाठवण्यात यावा तसेच हंगामात २४ तास ६५ मि,मी पेक्षा जास्त पाऊस झाला असेल तर अशा मंडळात अतिवृष्टीमुळे पिकाचे जनावर घरे व इतर नुकसानीचे संयुक्त पंचनामे करणे अपेक्षित होते परंतु आजपर्यंत तालुक्यात पंचनामे करण्याचे आदेश निघाले नसल्याने गंगापूर तालुक्यातील शेतकरी व नुकसान झाले नागरिक भरपाई पासून वंचित राहिले आहे वरील सर्व बाबींचा संदर्भानुसार संयुक्त पंचनामे करून पुढील सात दिवसात जिल्हा अधिकारी यांच्याकडे नुकसान भरपाई मिळेल असा अहवाल पाठवावा यासह आदी मागण्या इंजि.महेश गुजर, राहुल ढोले, विठ्ठल कुंजर, अण्णासाहेब जाधव, आदींनी निवेदनात नमूद केले आहे

## वरदा आसरकर पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार 2024 पुरस्काराने सन्मानित.



उरण । विठ्ठल ममताबादे उरण मधील अनेक विद्यार्थी विद्यार्थीनीनी अनेक क्षेत्रात उल्लेखणीय कामगिरी केली आहे. तशीच उत्तम व नेत्र दिपक कामगिरी उरणच्या वरदा आसरकर ने केल्यामुळे तिला राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. वरदा केदार आसरकर हिला स्केटिंग या खेळामध्ये उत्कृष्ठ कामगिरी बजावल्यामुळे हॉकी लिजेंड, पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. वरदा आसरकर हिला आतापर्यंत केलेल्या स्केटिंग या खेळामध्ये उत्कृष्ठ कामगिरीची दखल घेऊन हॉकी लिजेंड, पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ (कराड, सातारा) येथे सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. अमोल साठे व ऍड.सुरेंद्र कॅमेरामन (आशियाई सुवर्ण पदक विजेता) यांच्या टीमतर्फे करण्यात आले होते. दरवर्षी २९ ऑगस्ट हा दिवस हॉकीचे जादूगार मे. ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रिडापटूंना सन्मानित करण्यात येते. वरदा आसरकर हिला पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आल्या बद्दल व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्यावर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तर अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी तिची भेट घेउन तिला शुभेच्छा दिल्या आहेत.



# वरदा आसरकर पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ पुरस्काराने सन्मानित.

(चौसाळा प्रतिनिधी)

उरण दि ३०(उरण प्रतिनिधी )उरण मधील अनेक विद्यार्थी विद्यार्थीनीनी अनेक क्षेत्रात उल्लेखणीय कामगिरी केली आहे. तशीच उत्तम व नेत्र दिपक कामगिरी उरणच्या वरदा आसरकर ने केल्यामुळे तिला राष्ट्रीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. वरदा केदार आसरकर हिला स्केटिंग या खेळामध्ये उत्कृष्ठ कामगिरी बजावल्यामुळे हॉकी लिजेंड, पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्याबद्दल तिचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. वरदा आसरकर हिला आतापर्यंत केलेल्या स्केटिंग या खेळामध्ये उत्कृष्ठ कामगिरीची दखल घेऊन हॉकी लिजेंड, पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ (कराड, सातारा) येथे सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. अमोल साठे व ऍड.सुरेंद्र कॅमेरामन (आशियाई सुवर्ण पदक विजेता) यांच्या टीमतर्फे करण्यात आले होते. दरवर्षी २९ ऑगस्ट हा दिवस हॉकीचे जादूगार मे. ध्यानचंद यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय क्रीडा दिवस म्हणून साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या क्रिडापटूंना सन्मानित करण्यात येते. वरदा आसरकर हिला पद्मभूषण मेजर ध्यानचंद राष्ट्रीय क्रीडा पुरस्कार २०२४ ने सन्मानित करण्यात आल्या बद्दल व्हाट्सअप, फेसबुक, ट्विटर आदी सोशल मीडियाच्या माध्यमातून तिच्यावर कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.तर अनेक प्रतिष्ठित मान्यवरांनी तिची भेट घेउन तिला शुभेच्छा दिल्या आहेत.

# चुकीला माफी नाही, तुमचं प्रायश्चित अटळ! पंतप्रधान मोदींनी माफी मागताच जयंत पाटलांनी बाण सोडला

मुंबई: राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्यामुळे महाराष्ट्रातील राजकीय वातावरण प्रचंड तापले असताना पंतप्रधान मोदी यांनी वाढवण बंदराच्या उद्घाटन सोहळ्यात शिवरायांची माफी मागत या विषयावर पडदा टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, मोदींच्या या वक्तव्यानंतर शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी ट्विट करत प्रतिहल्ला केला. पंतप्रधान मोदी यांनी म्हटले होते की, छत्रपती शिवाजी महाराज माझे आराध्य दैवत आहेत. सिंधुदुर्गात जी घटना घडली त्याबद्दल आम्ही माफी मागतो. मात्र, जयंत पाटील यांनी या मुद्द्यावरुन पंतप्रधान मोदी यांना फटकारले. त्यांनी म्हटले की, भ्रष्टाचार आणि निष्काळजीपणाला महाराजांनी कधीच माफी दिली नव्हती. महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या दाखवलेल्या वाटेवर चालतो. त्यामुळे महाराष्ट्र या चुकीला माफी देऊ शकणार नाही. प्रायश्चित अटळ आहे, असे जयंत पाटील यांनी म्हटले. त्यामुळे मोदींनी माफी मागूनही महाविकास आघाडी या मुद्द्यावरुन माघार घ्यायला तयार नसल्याचे संकेत मिळत आहेत. यापूर्वी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार या दोघांनीही सिंधुदुर्गातील घटनेबद्दल जाहीर माफी मागितली होती. तसेच पुढील काही दिवसांत राजकोट किल्ल्यावर शिवाजी महाराजांचा उत्कृष्ट पुतळा उभारु. त्यासाठी राज्य सरकारने समिती स्थापन केली आहे. लवकरात लवकर शिवाजी महाराजांचा पुतळा उभारण्याच्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. राजकोट किल्ल्यावरील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी शेजारची खासगी जमीनही अधिग्रहीत केली जाणार आहे. शिवरायांचा नवा पुतळा भव्य आणि उत्तम दर्जाचा असेल. त्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शिल्पकार राम सुतार यांच्यात बोलणी झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. पंतप्रधान मोदींनी नेमकं काय म्हटलं? मला पंतप्रधानपदाचा उमेदवार निश्चित केल्यानंतर मी रायगड किल्ल्यावर जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीसमोर जाऊन प्रार्थना केली होती. एक भक्त आपल्या आराध्य दैवताची प्रार्थन करतो, तशी मी राष्ट्रसेवेच्या यात्रेला प्रारंभ केला होता. काही दिवसांपूर्वी सिंधुदुर्गात जे काही घडलं ते माझ्यासाठी आणि माझ्या सहकाऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज फक्त एक नाव नाही, फक्त एक राजा नाही, तर शिवाजी महाराज आमच्यासाठी आराध्य दैवत आहेत. आज मी मस्तक झुकवून मी माझं आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची त्यांच्या पायावर मस्तक ठेवून माफी मागतो. आमचे संस्कार वेगळे आहेत. आम्ही जे लोक नाही, जे या भूमीचे सुपूत्र वीर सावरकरांना अपमानित करतो, शिव्या देतात. देशभक्तांच्या भावना चिरडतात. तरीही वीर सावरकरांना शिव्या देऊनही माफी मागायला जे तयार नाहीत, ते न्यायालयात लढाई लढायला तयार आहेत. देशाच्या एवढ्या महान सुपूत्राचा अपमान करुन ज्यांना पश्चाताप होत नाही, महाराष्ट्राच्या जनतेने त्यांचे संस्कार ओळखावेत. मी आज महाराष्ट्रात आल्यावर सर्वात पहिले छत्रपती शिवाजी महाराजांची माफी मागण्याचे काम करत आहे. या घटनेमुळे ज्यांच्या भावना दुखावल्या आहेत, त्या शिवप्रेमींचीही मी माफी मागतो. माझे संस्कार वेगळे आहेत. आमच्यासाठी आमच्या आराध्य दैवताशिवाय काहीही मोठे नाही, असे पंतप्रधान मोदी यांनी सांगितले.

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडून चव्हाण कुटुंबियांचे सांत्वन



नांदेड प्रतिनिधी :

नांदेड : राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नांदेडचे दिवंगत खा.वसंतराव चव्हाण यांच्या निधनानंतर गुरूवारी चव्हाण परिवाराची नायगांव (बा.) येथे त्यांच्या निवासस्थानी भेट घेऊन सांत्वन केले.

# पनवेल तहसिल कार्यालयाबाहेरील दलालांचा अधिकाऱ्यावर प्रभाव, नागरिकांची होणारी लुट थांबवण्याची मनसेची मागणी

पनवेल / प्रतिनीधी : पनवेल तहसिल कार्यालयाबाहेर दलालांचे वर्चस्व असून पनवेल तहसील कार्यालयातील कामे दलाला शिवाय होत नाहीत हा पनवेल मधील जनतेला अनुभव आला आहे. येथे दलाल ठाण मांडून बसलेले आहेत. या ठिकाणी दाखल्यांसाठी, रेशनकार्ड काढण्यासाठी अनेक नागरिक येत असतात. त्यांना लगेच दाखले काढुन देतो असे सांगून दलालाकडून नागरिकांची लुट केली जाते. तसेच त्यांच्याकडून बोगस दाखले देखील बनवले जात असल्याच्या तक्रारी या निमित्ताने समोर आल्या आहेत. याप्रकरणी पनवेल मनसेने तहसीलदारांकडे तक्रार निवेदन दिले आहे.

नागरिकांच्या तक्रारीनुसार सेतू कार्यालयात काम करणारे कर्मचारी हे जास्त पैसे घेवून दलालांना एक दिवसात दाखले बनवून देत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला आहे. तर येथे काम करणाऱ्या काहीवर गुन्हे दाखल असताना देखील ते या ठिकाणी काम करतात. गेल्या आठवड्यात एका दलालाकडून एका ग्राहकाला उत्पन्न कमी करण्यासाठी साहेबांनी साडेचार हजार रूपये मागितले आहेत असे सागण्यात आले आहे. हे साहेब कोण ही चर्चा सध्या चालू आहे. या साहेबानंतर कारवाई होईल का? अशा एक ना अनेक तक्रारी नागरीकांकडून होत आहेत. या कार्यालयातील अधिकाऱ्यांनीच दलाल ठेवले असल्याच्या तक्रारी नागरिक करत आहेत. तरी या पत्राव्दारे तहसिल कार्याल्याबाहेर दलालाकडून नागरिकांची होणारी लुट थांबवावी व यामध्ये जे दोषी आहेत. त्यांच्यावर कारवाई करावी अन्यथा नागरिकांच्या व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या रोषाला सामोरे जावे लागेल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी दिनेश मांडवकर, पनवेल तालुका सचिव, विश्वास पाटील पनवेल तालुका उपाध्यक्ष, विद्याधर चोरघे, नेरे विभाग अध्यक्ष, कुणाल फडके, आदई विभाग अध्यक्ष, सुभाष पालकर उपस्थित होते.

# उमेदवारी मिळाल्यास तन-मन धनाने पाठीशी उभे राहू
# अड. नरसिंह जाधव यांना गावागावातून मिळतोय लोकांचा उत्स्फूर्त पाठिंबा

पाटोदा प्रतिनिधी शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे लिगल सेलचे प्रदेश उपाध्यक्ष तथा मराठवाड्याचे प्रमुख ॲड. नरसिंह जाधव हे आष्टी, पाटोदा, शिरूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवू इच्छित असून, त्यासाठी गेल्यावर्षभरापासून ते मतदार संघातील आष्टी पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील गावागावात सर्व लोकांच्या भेटी घेत आहेत. आपण विधानसभा निवडणुकीला शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून उमेदवारी मिळाल्यास निवडणूक लढविणार असल्याचे ते बोलून दाखवीत आहेत, यावेळी लोकांकडूनही त्यांना सकारात्मक प्रतिसाद मिळत असून, आपल्यासारख्या सुशिक्षित आणि उच्चविद्याभूषित नव्या तरुण नेतृत्वाला उमेदवारीचे संधी मिळत असेल तर आम्हीही तण मन धनाने आपल्या पाठीशी उभे राहू असा शब्द देत आहेत. राज्यात नोव्हेंबर महिन्यामध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणूक



सर्वत्र इच्छुक उमेदवारांची धामधूम सुरू असून आष्टी मतदारसंघातही सर्वच पक्षांकडून उमेदवारीसाठी इच्छुक असल्याने उमेदवार मतदार संघात गावागावातून दौरे करून लोकांच्या भेटीगाठी घेत आहेत. आष्टी मतदार संघात शरद पवारांना मानणारा मोठा वर्ग आहे. यामध्ये पाटोदा तालुक्याचे भूमिपुत्र आणि शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून बीड जिल्ह्यात ओळख असलेले पाटोदा पंचायत समितीचे सभापती राहिलेले स्व. ॲड. लक्ष्मणराव जाधव यांचे सुपुत्र आणि उच्च न्यायालयातील ॲड. नरसिंह जाधव हे शरदचंद्र पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाकडून विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक असून, त्यांनी गेल्या वर्षभरापासून मतदार संघातील गावागावांमध्ये दौरे सुरू केले आहेत. गेल्या दोन दिवसापासून पाटोदा तालुक्यातील गावा गावात जाऊन नागरिकांच्या भेटी घेत आहेत.ॲड. जाधव यांनी पाटोदा तालुक्यातील बेन्सुर, तांबाराजुरी, मंगेवाडी, बेलेवाडी, मंजिरी, पाटोदा शहर,वैद्यकिन्ही,ढाळेवाडी, शिरुर कासर शहर, तसेच इतर गावात दौरा केला. तालुक्यातील बऱ्याच गावातील नागरिकांकडून त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. तसेच आपल्यालां म्हणजेच ॲड. नरसिंह जाधव यांच्या रूपाने पाटोदा तालुक्यात उमेदवारी मिळाल्यास आम्ही गावकरी तालुकावादावर आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास यावेळी बोलताना व्यक्त केला. पाटोदा तालुक्यातील पहिल्यांदा किमान उमेदवारी मागण्यासाठी इच्छुक असल्याचे पाहून लोकातही ॲड. जाधव यांचे कौतुक होत आहे. तुम्ही उमेदवार म्हणून आल्यास सर्व मतभेद बाजूला ठेवून आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असा विश्वास पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील नागरिक व्यक्त करीत असून, पाटोदा तालुक्याला उमेदवारीची संधी मिळावी, अशा प्रकारेचे ठरावही गावागावातून ॲड. जाधव यांना उमेदवारी मिळवण्यासाठी दिले जात आहेत.

# जोमेगाव येथे साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी

## सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते २५ लक्ष रुपयांच्या विकास कामांचे उद्घाटन

नांदेड : लोहा तालुक्यातील जोमेगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती तथा युवा नेते विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे व सर्व महामानवांना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले, यावेळी सभापती शिंदे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सभापती विक्रांत शिंदे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त सर्व समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या, यावेळी लोहा कंधार मतदार संघाचे लोकप्रिय कर्तव्यदक्ष आमदार श्यामसुंदर शिंदे यांच्या विकास निधीतून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सांस्कृतिक सभागृहासाठी 10 लक्ष व गाव अंतर्गत सी.सी. रस्त्यासाठी 15 लक्ष रुपयाचा निधी दिला होता,लोकशाहीर अण्णाभाऊ शिंदे यांच्या माध्यमातून जोमेगाव येथील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या विविध विकास कामाला



साठे सांस्कृतिक सभागृहाचे लोकार्पण व सी. सी रस्त्याचे भूमिपूजन यावेळी सभापती विक्रांत पाटील शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बोलताना सभापती शिंदे म्हणाले की आमदार शामसुंदर भरीव निधी देऊन ही कामे आमदार शिंदे यांनी दर्जेदार पद्धतीने पूर्ण करून घेतली असून यापुढेही उमरा सर्कलमधील मूलभूत विकास कामासाठी आमदार शिंदे यांच्या माध्यमातून भरीव निधी दिला जाणार असल्याची ग्वाही यावेळी सभापती शिंदे यांनी बोलताना दिली, यावेळी जोमेगावच्या सरपंच श्रीमती कमलबाई संभाजी शिंदे,माजी सरपंच आदिनाथ पाटील जोमेगावकर,प्रभाकर पा. शिंदे, माजी सरपंच पुरभाजी शेटे, माजी सरपंच कोंडीबा गव्हाणे,ग्रामपंचायत सदस्य अंताजी शेटे, रोजगार सेवक मनोहर भुरे,शालेय समिती अध्यक्ष चंद्रकांत पा. शिंदे, पोलीस पाटील मारुती पांचाळ, जयंती मंडळाचे अध्यक्ष माधव गव्हाणे, सचिन गव्हाणे, संजीव गव्हाणे, सह गावकरी, जयंती मंडळाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठया संख्येने उपस्थित होते.

# शाळेमध्ये तात्काळ सीसीटीव्ही कॅमेरे बसवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक पद्धत लागू करा-संभाजी ब्रिगेड

नांदेड : प्राथमिक, माध्यमिक शाळेमध्ये तात्काळ सी.सी.टि.व्हि. कॅमेरे बसवून शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रीक पध्दत लागु करावी असे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांना देण्यात आले.

राज्यामध्ये प्राथमिक व माध्यमक शाळेमध्ये लैंगीक छळाच्या घटना मोठ्या प्रमाणात घडत आहेत. त्याअनुषंगाने आपल्या जिल्ह्यात असे प्रकार होऊ नये म्हणून आपण स्वतः या प्रकरणात लक्ष घालून आपल्या कार्यक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळेमध्ये तात्काळ सि.सि.टि.व्हि. कॅमेरे बसवण्यात यावे व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची बायोमॅट्रीक पध्दत कार्यान्वीत करावी जेणे करून भविष्यात बदलापूर सारख्या घटना आपल्या जिल्ह्यामध्ये घडू नये अशी कारवाई आपण आपल्या स्तरावर करावी अन्यथा येत्या पंधरा दिवसात ही पध्दत लागू न केल्यास आपल्या कार्यालयास कोणत्याही क्षणी टाळे लावण्यात येतील व होणाऱ्या परिणामास आपण स्वतः जवाबदार असाल याची गांभीर्याने नोंद घ्यावी अशा आशयाचे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने देण्यात आले यावेळी संभाजी ब्रिगेडचे विभागीय अध्यक्ष संकेत पाटील जिल्हाध्यक्ष सुभाष कोल्हे,अशोक कदम , किरण वानखेडे अंकुश कोल्हे उपस्थित होते

# माधव महाराज डाके यांच्या चातुर्मास उत्सवात येत्या सोमवारी अतुल महाराज येवले यांच्या प्रवचनाचे आयोजन:



बीड प्रतिनिधी बीड येथील स्वराज्य नगर मधील ह भ प माधव महाराज डाके काठवडेकर यांच्या निवासस्थानी प्रतिवर्षिक चातुर्मास् उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न होतो. त्या निमित्त नामजप आणि दर सोमवारी ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा आयोजित केली जाते. सोमवार दि. २/९/२४ रोजी रात्री ८ते९ यावेळी ह भ प अतुल महाराज येवले सोनगाव तालुका पाटोदा यांची प्रवचन सेवा संपन्न होणार आहे तरी सर्व भाविकांनी या प्रवचन सेवेचा लाभ घ्यावाअसे माधव महाराज डाके यांच्या वतीने कळवण्यात येत आहे.

# मालवण येथील छत्रपती शिवरायांच्या पुतळा दुर्घटनेच्या निषेधार्थ मारतळा येथे केंन्द्र व राज्य सरकार विरोधात निषेध आंदोलन

नांदेड : मालवण येथील आठ महिन्यापूर्वी उभारलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्याने आज नांदेड - हैद्राबाद महामार्गावर मारतळा ता. लोहा येथे उमरा सर्कल सकल मराठा समाजाच्या व शिवप्रेमींच्या वतीने निषेध आंदोलन करून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, व दोन्ही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांचा तीव्र शब्दात धिक्कार करत निषेध व्यक्त करण्यात आला.

यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या सह नारायण राणे व नितेश राणे तसेच मंत्री दिपक केसरकर या



सर्वांसह सरकार विरोधी निषेधाच्या घोषणा सकल मराठा समाज व शिवप्रेमींनी देऊन निषेध व्यक्त केला. तसेच मुख्यमंत्री व दोन्हीही उपमुख्यमंत्र्यांच्या प्रतिकात्मक प्रतिमेला जोडे मारण्यात आले. व सबंधीत कंत्राटदाराविरूध्द लवकरात लवकर गुन्हा दाखल करावावा असे निवेदन उस्माननगर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक चंद्रकांत पवार यांना सकल मराठा समाजाच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी बंडू पाटील , शिवसेना उपजिल्हाप्रमुख संजय पाटील ढेपे, कॉंग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष भास्कर पाटील जोमेगावकर , मधुकर महाराज बारूळकर , मोहनराव सिरसाट ,माधवराव ढेपे, प्रदिप ढेपे, उध्दव पा. ढेपे , संतोष पाटील वडवळे , किरण गव्हाणे, अंकुश कोल्हे, हनमंत सावळे , भास्कर सोमवारे , जनार्धन वडवळे , व्यंकट माली ढगे , विलास उबाळे , तुळशीराम वडवळे , विनायक भरकडे, आनंद ढगे, माधव वडवळे , राम येडे, अवधूत भरकडे, तिरूपती ढेपे ,वेदगीर महाराज आदीं आंदोलनात सहभागी झाले होते. यावेळी अनुचित प्रकार घडू नये म्हणून उस्माननगर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक सुनिल सुर्यवंशी, बीट जमादार निळकंठ श्रीमंगले व त्यांच्या सहकाऱ्यांच्या वतीने चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.

# गणेशोत्सव पार्श्वभूमीवर लिंबागणेश येथे शांतता कमिटीची बैठक संपन्न; आनंदोत्सव शांतता पुर्वक संयमाने साजरा करण्याचे सपोनि.चंद्रकांत गोसावी यांचे आवाहन

**लिंबागणेश:-( दि .३०) बीड---** तालुक्यातील लिंबागणेश येथे आज दि.३० शुक्रवार रोजी सकाळी गणेशोत्सवासह येणाऱ्या सणांच्या पार्श्वभूमीवर मारोती मंदिरात नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी.चंद्रकांत गोसावी यांच्या मार्गदर्शनात शांतता कमिटीची बैठक संपन्न झाली. चंद्रकांत रोकडे यांना लिंबागणेश येथील गणेशोत्सव दरम्यान कारवयक्रमाची सविस्तर माहिती घेतली. ग्रामस्थांनी केलेल्या सुचनांचे पोलिस प्रशासनाकडून आवश्यक ती उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.यावेळी ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना पोलिस अधीक्षक बीड यांच्या मार्गदर्शक सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.ध्वनीप्रदुषण बाबतीत काळजी घ्यावी,डिजे लावण्यास परवानगी नसुन कायद्याचे उल्लंघन झाल्यास गुन्हे दाखल करण्यात येतील.सोशल मिडीयावर आक्षेपार्ह पोष्ट दिसुन आल्यास कायदा हातात न घेता पोलिसांकडे संपर्क साधावा, महिलांना सन्मानाची वागणूक द्यावी. गावात होर्डिंग्ज लावण्यापूर्वी ग्रामपंचायतची परवानगी घेणे बंधनकारक आहे. लिंबागणेश येथील भालचंद्र गणपतीची महिमा सर्वदूर असुन शांततेची परंपरा कायम राखत संयमाने उत्सव साजरा करावा. कुठलेही गालबोट लागु नये यासाठी सर्वांनी प्रशासनाला सहकार्य करावे. गणेश मंडळाचे पदाधिकारी यांनी स्वयं सेवक नेमुन नियंत्रण ठेवावे. पोलिस प्रशासन कायम आपणास सहकार्य करील असे आश्वासन दिले.यावेळी पोलिस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे,सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, कल्याण वाणी उपसरपंच बाळकृष्ण थोरात, बाळकृष्ण मुळे, शंकर वाणी,भालचंद्र देवस्थान पुजारी श्रीकांत जोशी,वरद जोशी,ग्रां.स. श्रीहरी निर्मळ ,दामु



थोरात, रमेश गायकवाड, भगवान मोरे,अशोक जाधव ,अक्षय वाणी, संतोष भोसले,पप्पु आवसरे,अशोकराजे वाणी, दादा गायकवाड, सुरेश ढवळे, नाना वाणी, रामकिसन गिरे,आश्रुबा गिरे, सय्यद बशीर, सुखदेव वाणी, चेतन कानिटकर, औदुंबर थोरात, सुरेश निर्मळ, पत्रकार हरीओम क्षीरसागर , डॉ.गणेश ढवळे,पो.हे.ढाकणे, राऊत,डोंगरे, मुंढे आदि.उपस्थित होते.

# बहिणीच नव्हे, लेकीही होणार मालामाल, लेक लाडकी योजनेत मिळणार घसघशीत रक्कम

## या योजनेनुसार एखाद्या घरात मुलीने जन्म घेतला तर ती १८ वर्षाची होईपर्यंत तिला १ लाख १ हजार रुपये टप्प्याने देण्यात येतात.

### कोणत्या टप्प्यावर किती पैसे मिळणार?

मुलीच्या जन्मानंतर पाच हजार रूपये या कुटुंबाला मिळणार आहेत. ही मुलगी पहिलीत गेली की सहा हजार रूपये मिळतील. सहावीत गेली की सात हजार रुपये मिळणार आहे. तसंच पुढच्या शिक्षणासाठीही सरकारकडून पैसे दिले जातील. ही मुलगी अकरावीत गेली ती आठ हजार रुपये दिले जातील. तर वयाची 18 वर्षे पूर्ण झाल्यावर 75 हजार रूपये सरकारकडून दिले जातील.




आगामी विधानसभा निवडणुका डोळ्यासमोर ठेवून राज्य सरकारकडून अनेक घोषणा करण्यात आल्या. लाडकी बहीण या योजनेला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळताना दिसतोय. त्यानंतर सरकारने लाडका भाऊ योजनेचीही घोषणा केली. लाडकी बहीण योजनेअंतर्गत पात्र ठरलेल्या महिलाना दरमहा 1500 रुपये दिले जातात. पण त्यापूर्वीच राज्यातील मुलींसाठीही एक योजना सरकारने जाहीर केली होती, त्याअंतर्गत घसघशीत रक्कमही मिळते. या योजनेनुसार एखाद्या घरात मुलीने जन्म घेतला तर ती 18 वर्षाची होईपर्यंत तिला 1 लाख 1 हजार रुपये टप्प्याने देण्यात येतात. नेमकी ही योजना काय आहे, त्यासाठी कोणत्या अटींची पूर्तता करावी लागते, त्याची सविस्तर माहिती जाणून घेऊया. 'लेक लाडकी' योजनाराज्य सरकारने महिलांसाठी याआधीपासूनच अनेक योजना सुरु केल्या आहेत. लाडकी बहिण योजनेपूर्वी 'लेक लाडकी' ही योजना सुरु केली होती. मुलीच्या जन्मापासून ती अठरा वर्षाची होईपर्यंत टप्याटप्याने एकूण 1 लाख 1 हजार रुपये रक्कम प्रदान करण्याची ही योजना आहे. पिवळ्या आणि केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबात 1 एप्रिल 2023 रोजी किंवा त्यानंतर जन्म झालेल्या कन्येला हे अर्थसहाय्य राज्यसरकारकडून देण्यात येते.

### काय आहेत अटी ?

1 एप्रिल 2023 या दिवसानंतर जन्माला येणाऱ्या मुलींसाठी सरकारने विशेष योजना आखली आहे. पिवळ्या आणि केशरी रेशनकार्ड धारक कुटुंबातील मुलींना ही योजना लागू होते. ज्या कुटुंबातील मुलीला या योजनेचा लाभ घ्यायचा आहे. ते कुटुंब महाराष्ट्रातील रहिवासी असणं आवश्यक आहे. तसंच या कुटुंबाचं बँकेत खातं असणं आवश्यक आहे. मुख्य म्हणजे या कुटुंबाचं वार्षिक उत्पन्न 1 लाख रुपयांपेक्षा जास्त नसावं. पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हफ्त्यासाठी व दुसऱ्या आपत्याच्या दुसऱ्या हफ्त्यासाठी अर्ज सादर करताना माता किंवा पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य असेल.

### अर्ज कसा भराल ?

तुम्ही जिथे राहता तिथल्या अंगणवाडीत तुम्ही अर्ज करू शकता. या अर्जात वैयक्तिक माहिती भरावी लागेल. मोबाईल नंबर, रहिवासी पत्ता, मुलीची माहिती, बँक खात्याची माहिती देऊन हा अर्ज करता येऊ शकतो.

कोणती कागदपत्रं लागतील ?

या योजनेचा लाभ घेण्यासाठी काही कागदपत्रांची पूर्तता करणं आवश्यक आहे.

– लाभार्थी मुलीच्या जन्माचा दाखला
– कुटुंबाच्या उत्पन्नाचा दाखला
– कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेचं प्रमाणपत्र
– पालकांचे आधारकार्ड
– बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत
– रेशनकार्ड ( पिवळे अथवा केशरी रेशन कार्ड- साक्षांकित प्रत)
– मतदार ओळखपत्र
– लाभार्थीचा शाळेचा दाखला
– अंतिम लाभासाठी मुलीचा विवाह झालेला नसणे आवश्यक आहे.

# सलीम भाई कुरेशी यांचे निधन


जालना/प्रतिनिधी घनसावंगी तालुक्यातील रांजणी येथील प्रतिष्ठीत नागरिक व पत्रकार असलम कुरेशी यांचे वडिल सलीम भाई कुरेशी यांचे शुक्रवारी सायंकाळी 5 वाजता निधन झाले. ते 70 वर्षांचे होते. त्यांच्या मागे 4 मुले, 3 मुली, जावई, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. हाजी नीलम भाई कुरेशी व कय्युम भाई कुरेशी यांचे ते बंधु होते. त्यांचा दफनविधी शनिवारी सकाळी 9 वाजता रांजणी येथे होईल.

# स्वाराती रुग्णालयात रुग्ण आणि नातेवाईकांना प्रवेशपत्र झाले बंधनकारक

## कोलकाता आणि रत्नागिरी येथील घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाचा स्वागतार्ह निर्णय

अंबाजोगाई । परवेज पटेल

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांना सुरक्षेच्या कारणास्तव प्रवेशपत्र बंधनकारक करण्यात आले आहे. डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांवर उपचार करताना येणारे अडथळे कमी करणे आणि त्यांना आराम मिळावा यासाठी स्वाराती प्रशासनाने हा निर्णय घेतला आहे अल्पदरात मिळणाऱ्या सुयोग्य उपचारांमुळे बीडसह आजूबाजूच्या जिल्ह्यातील रुग्णही अंबाजोगाईच्या स्वाराती रुग्णालयात उचार घेण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे येथे रुग्णांची आणि नातेवाईकांची प्रचंड वर्दळ असते. आंतररुग्ण कक्षात रुग्ण उपचारासाठी थांबल्यास भेटण्यासाठी येणारे नातेवाईकही गर्दी करतात. त्यामुळे रुग्णांना संसर्गाची भीती असते, तसेच त्यांच्या आरामातही व्यत्यय येतो. एखाद्या रुग्णास सतत नातेवाईक भेटण्यासाठी ये असल्यास त्याचा त्रास त्या कक्षातील अन्य रुग्णांनाही होतो. त्यामुळे या गर्दीला आळा घालणे आवश्यक झाले आहे. तसेच, मागील काही दिवसात कोलकाता येथील महिला डॉक्टर आणि रत्नागिरी येथील परिचारिका यांच्यावर अत्याचाराच्या निंदनीय घटना उघडकीस आल्या. त्यामुळे डॉक्टर, परिचारिका, कर्मचारी यांची सुरक्षा आणि रुग्णांचे हित लक्षात घेता आणि आरोग्य विभागाचे सचिव, आयुक्त व न्यायालयाने रुग्णालयामध्ये उपचाराकरीता असलेल्या आंतररुग्ण कक्षातील रुग्ण व रुग्णाचे नातेवाईक यांच्यासाठी प्रवेशपत्र पद्धत (पास सिस्टीम) कार्यान्वीत करण्याबाबत



सूचीत केले होते. त्यानुसार स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे पास सिस्टिम कार्यान्वित करण्यात आल्याची माहिती अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी दिली आहे. प्रत्येक रुग्णासाठी मिळणार दोन प्रवेशपत्र स्वाराती रुग्णालयात आंतररुग्ण कक्षात उपचार घेत असलेल्या रुग्णासोबत असलेल्या दोन नातेवाईकांना पास देण्यात येईल या पासची वैधता ही पाच दिवसाकरीता असेल, त्यानंतर आवश्यकता असल्यास नव्याने पास घेणे बंधनकारक असणार आहे. रुग्णालयात येणारे नागरिक, सामाजिक, राजकीय कार्यकर्ते, रुग्ण आणि नातेवाईकांनी प्रवेशपत्र पद्धतीचे पालन करून सहकार्य करावे आणि आपल्या रुग्णासह अन्य रुग्णांचीही काळजी घ्यावी असे आवाहन अधिष्ठाता धपाटे यांनी केले आहे

# वीज कंत्राटी कामगारांना उर्जामंत्र्याचे आश्वासन.

## विविध विषयावर झाली सकारात्मक चर्चा.

उरण । विठ्ठल ममताबादे

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघाने दि.२४ ऑगस्ट २०२४ रोजी नागपुरातील रेशीमबाग मैदानापासून राज्याचे ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या घरावर काढलेल्या मोर्चाच्या पार्श्वभूमीवर उपोषणाच्या ६ व्या दिवशी ऊर्जामंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस यांनी संघटनेच्या शिष्टमंडळास गुरुवार दि.२९ ऑगस्ट २०२४ रोजी त्यांच्या नागपुरातील देवगिरी या शासकीय निवास स्थानी दुपारी २ वाजता चर्चा करण्यास बोलावन्यात आले होते. या वेळी संघटनेकडून हरियाना येथील शासन निर्णय व कामगारांचा वस्तुनिष्ठ अहवाल त्यांच्याकडे संघटनेकडून सादर करण्यात आला. तिन्ही वीज कंपनीतील कंत्राटी कामगारांच्या वेतनात वाढ व समानता व कंत्राटदार विरहित कामगार पद्धती करिता हरियाना पॅटर्न या दोन प्रमुख मागण्यांवर संघटना ठाम असून ठोस धोरणात्मक निर्णय तातडीने झाला पाहिजे अशी भूमिका संघटनेचे अध्यक्ष निलेश खरात यांनी मांडली या पूर्वी मा.ना.ऊर्जामंत्री यांनी यापुर्वी अनेकदा दिलेल्या आश्वासनाची पूर्तता प्रशासनाकडून झाली नाही. प्रामुख्याने भरती मध्ये अनुभवी कामगारांना जादा मार्क, वयात सूट,विशेष आरक्षण, बँक अकाउंट द्वारे थेट खात्यात पैसे, कामगारांना मेडिक्लेम व अपघात विमा व भ्रष्ट कंत्राटदारांवर कारवाई न होऊन कामावरून कमी केलेले कामगार कामावर न घेतल्याने कामगारांमध्ये नाराजी निर्माण झाली व याच मुळे संघटनेला वारंवार आंदोलने करावी लागत असल्याचे महामंत्री सचिन मेंगाळे म्हणाले. वीज कंत्राटी कामगारांच्या प्रश्नांवर सरकार सकारात्मक असून तातडीने मी स्वतः प्रशासना सोबत या सर्व विषया संबंधी संघटनेच्या शिष्टमंडळा सोबत मीटिंग आयोजित करून निश्चितच सकारात्मक तोडगा काढू, या कष्टकरी कामगारांना नाराज ठेवणार नाही असे आश्वासन



देवेंद्रजी फडणवीस यांनी शिष्टमंडळाला दिले. संघटनेचे च्या शिष्टमंडळात भारतीय मजदूर संघाचे क्षेत्रीय संघटन मंत्री सी व्ही राजेश,विदर्भ प्रदेश महामंत्री गजानन गटलेवार, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघांचे अध्यक्ष निलेश खरात, सरचिटणीस सचिन मेंगाळे, कोषाध्यक्ष सागर पवार,संघटनमंत्री उमेश आणेराव, उपमहामंत्री राहूल बोडके, सचिव अभिजीत माहुलकर, तात्या सावंत, जयेंद्र थुळ, संतोष कोल्हे, समीर हांडे, योगेश सायवनकर, कामगार संघाचे विठ्ठल भालेराव, दत्ता धामणकर उपस्थित होते. भारतीय मजदूर संघाचे क्षेत्रीय संघटन मंत्री सी व्ही राजेश यांच्या हस्ते उपोषणाला बसलेल्या कामगारांना शित पेय देवुन उपोषण स्थगित करण्यात आले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077